भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# ग्रामिण कृषि मौसम सेवा

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक - सिंधुदुर्ग

कालावधी (दिनांक १४.०५.२०२१ ते १८.०५.२०२१)

| अंक ३९/२०२१ | | | | | | | दिनांक १३.०५.२०२१ | कालावधी ५ दिवस | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (०६/०५/२०२१ ते १२/०५/२०२१ पर्यंत) | | | | | | | हवामानाचे घटक | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पुर्वानुमान (वैधता १४.०५.२०२१ ते १८.०५.२०२१ पर्यंत) | | | | |
| ०६/०५ | ०७/०५ | ०८/०५ | ०९/०५ | १०/०५ | ११/०५ | १२/०५ | दिनांक | १४/०५ | १५/०५ | १६/०५ | १७/०५ | १८/०५ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मि. मी) | १४ | ४ | २४ | ९६ | ६० |
| ३८.० | ३६.० | ३६.० | ३८.० | ३९.० | ३८.५ | ३७.५ | कमाल तापमान (अं. से) | ३५ | ३९ | ३९ | ३५ | ३५ |
| २५.५ | २५.५ | २५.० | २५.५ | २४.५ | २५.० | २४.५ | किमान तापमान (अं. से) | २६ | २८ | २९ | २७ | २६ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | निरभ्र | निरभ्र | ढगाळ | मेघाच्छादन (ऑक्टा.) सकाळ | ८ | ८ | ८ | ८ | ८ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | निरभ्र | ढगाळ | ढगाळ | मेघाच्छादन (ऑक्टा.) दुपार | | | | | |
| ७७ | ८५ | ८५ | ८२ | ७८ | ८२ | ८५ | सकाळची सापेक्ष आर्द्रता(%) | ७६ | ७३ | ६६ | ८४ | ८९ |
| ५३ | ५९ | ५३ | ४७ | ५३ | ५३ | ४८ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ५१ | ४० | ३० | ६४ | ८० |
| २.२ | २.३ | २.२ | १.६ | २.२ | २.१ | १.९ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | ००८ | ०१३ | ०२८ | ०४१ | ०१८ |
| स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | वा-याची दिशा सकाळ | वायव्ये कडे | दक्षिणोत्तर / नैऋत्ये कडे | उत्तरोत्तर / ईशान्ये कडे | दक्षिणे कडे | दक्षिणे कडे |
| पश्चिमोत्तर/ नैऋत्ये कडे | पश्चिमोत्तर/ नैऋत्ये कडे | पश्चिमोत्तर/ नैऋत्ये कडे | पश्चिमोत्तर/ नैऋत्ये कडे | पुर्वोत्तर / आग्नेय कडे | पश्चिमोत्तर/ वायव्ये कडे | पश्चिमोत्तर/ नैऋत्ये कडे | वा-याची दिशा दुपार | | | | | |

| मागील वर्षातील (२०२०) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०२१ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०२१ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ४८६०.० | २४.८ | ०.० | ०.० |

| | |
|---|---|
| पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती | सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये पुढील पाच दिवसामध्ये दिनांक १४ ते १८ मे या कालावधी दरम्यान दिनांक १४ व १५ मे रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या, दिनांक १६ मे रोजी ब-याच ठिकाणी मध्यम स्वरुपाच्या तर दिनांक १७ व १८ मे रोजी बहुतांश ठिकाणी अनुक्रमे मुसळधार व मध्यम स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता आहे. कमाल व किमान तापमानात ब-याच अंशी वाढ होऊन आर्द्रतेमध्येही बरीच वाढ संभवत आहे. तसेच हवामान आर्द्र व पुर्णतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे. असा अंदाज प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांच्याकडून वर्तविण्यात आला आहे. |
| विस्तारीत श्रेणीतील हवामान अंदाज — पर्जन्यमान | दक्षिण कोकण व गोवा या हवामान उपविभागामध्ये दिनांक १९ ते २५ मे या कालावधी दरम्यान पर्जन्यमान सरासरीपेक्षा जास्त होण्याची शक्यता आहे. (सदर कालावधी दरम्यान ०.५७ मिमी एवढे सरासरी पर्जन्यमान असते तरी या वर्षी सदर कालावधी दरम्यान ७.१७ मिमी पर्जन्यमान होण्याची शक्यता आहे व ते सरासरीपेक्षा ११५०.१८ टक्क्यांनी कमी होण्याची शक्यता आहे.) |
| इशारा | सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये पुढील पाच दिवसामध्ये दिनांक १४ ते १८ मे या कालावधी दरम्यान दिनांक १४ व १५ मे रोजी तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा-वादळ व मेघगर्जनेसह हलक्या स्वरुपाच्या, दिनांक १६ मे रोजी तुरळक ते ब-याच ठिकाणी सोसाट्याचा वारा-वादळ व मेघगर्जनेसह मुसळधार स्वरुपाच्या तर दिनांक १७ व १८ मे रोजी बहुतांश ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता आहे असा ईशारा प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांच्या कडून देण्यात आलेला आहे. |
| सर्वसाधारण कृषि सल्ला | विषुवृतीय व आग्नेय अरबी समुद्रामध्ये लक्षद्वीप जवळ आज दिनांक १३ मे रोजी समुद्र सपाटीपासुन ३.१ किमी उंचीवर कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झालेले आहे तसेच ते दिनांक १४ मे रोजी सकाळी लक्षद्वीप जवळ अधिक सुस्पष्ट होण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर दिनांक १५ मे रोजी सदर कमी दाबाचे क्षेत्र अधिकच तिव्र होऊन दिनांक १६ मे रोजी त्याचे चक्रिवादळात रुपांतर होण्याची शक्यता आहे व ते अधिकाधिक तिव्र होऊन उत्तरेकडे सरकुन दिनांक १८ मे रोजी संध्याकाळी गुजरात व पाकिस्तान किनारी धडकण्याची शक्यता आहे. त्यामुळे वा-याचा वेग वाढुन समुद्र खवळलेल्या अवस्थेत असणार आहे. सागरी मासेमारी करणा-या मच्छिमारांनी पुढील ५ दिवसांमध्ये खोल समुद्रामध्ये मासेमारीस जाऊ नये.<br>चक्रिय वादळामुळे वा-याचा वेग ५० ते ६० किमि असण्याची शक्यता असल्याने घर किंवा वस्तीजवळील धोकादायक झाडे किंवा झाडांच्या फांद्या असतील तर त्या त्वरीत तोडुन घेण्यात याव्यात तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सर्व नागरीकांना व शेतकरी बंधुंना आवाहन करण्यात येते की, दिनांक १४ ते १७ मे या कालावधी दरम्यान सर्वांनी सुरक्षित ठिकाणी रहावे. |
| संक्षिप्त संदेश सल्ला | सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये दिनांक १७ व १८ मे रोजी सोसाट्याचा वा-या वादळासहित बहुतांश ठिकाणी मुसळधार स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता आहे. |

### हवामान अंदाजावर आधारीत कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | पिक निहाय कृषि सल्ला |
|---|---|---|
| आंबा | काढणी | जिल्ह्यामध्ये दिनांक १४ ते १८ मे, २०२१ या कालावधी दरम्यान तुरळक ते ब-याच ठिकाणी सोसाट्याचा वारा व मेघगर्जनेसह हलक्या ते मुसळधार स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता वा-या वादळामध्ये नविन लागवड केलेली व साधारणतः २ वर्षापर्यंतची आंबा कलमे कोलमडु नयेत यासाठी नविन लागवड केलेल्या आंबा कलमांना बांबूच्या काठीचा आधार द्यावा. आंबा बागेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा<br>जिल्ह्यामध्ये आंबा पिक बहुतेक ठिकाणी मोठया आकाराची व काढणीची फळे अशी अवस्था आहे. जिल्ह्यामध्ये दिनांक १४ ते १८ मे, २०२१ या कालावधी दरम्यान तुरळक ते ब-याच ठिकाणी सोसाट्याचा वारा व मेघगर्जनेसह हलक्या ते मुसळधार स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता नुकसान टाळण्यासाठी तयार फळे सकाळी दहाच्या अगोदर व दुपारी चारच्या नंतर नुतन झेल्याच्या सहाय्याने ८० ते ८५ % (चौदा आणे) पक्वतेला लवकरात लवकर काढुन घ्यावीत. फळे काढणीच्या किमान ८ दिवस अगोदर झाडावर कोणतेही औषध फवारु नये.<br>येत्या ५ दिवसांमध्ये कमाल व किमान तापमानात वाढ होऊन आरोह प्रकारच्या पर्जन्याची शक्यता आहे त्यामुळे होणारी तापमान वाढ लक्षात घेता तापमान वाढीमुळे हापुस आंबा फळांमध्ये साक्याचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे. साका टाळण्यासाठी व उष्णतेपासून बचाव करण्यासाठी तयार फळे सकाळी दहाच्या अगोदर व दुपारी चारच्या नंतर काढावीत व सावलीत ठेवावीत. ऊन्हामध्ये फळांची वाहतुक करु नये.<br>जिल्ह्यामध्ये दिनांक १४ ते १८ मे, २०२१ या कालावधी दरम्यान तुरळक ते ब-याच ठिकाणी सोसाट्याचा वारा व मेघगर्जनेसह हलक्या ते मुसळधार स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता अपरिपक्व व काढणीस तयार नसलेल्या आंबा फळावर करपा रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे, पाऊसामुळे आंबा फळावर डाग पडुन होणारे नुकसान टाळण्यासाठी पाऊसाचा अंदाज घेऊन आंबा पिकावर कार्बेन्डॅझीम ५० टक्के पाण्यात विरघळणारी पावडर (१० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात) फवारावी. |

| | | |
|---|---|---|
| | | फळे पिकात घालताना फळ कुजीचा प्रादुर्भाव वाढु नये यासाठी फळांना उष्ण जल प्रक्रिया द्यावी. त्यासाठी फळे ५२ अंश से. तापमानाच्या पाण्यात १० मिनीटे बुडवुन नंतर आडीत घालावीत.<br>आंबा लागवडीसाठी निवडलेल्या क्षेत्रातील झाडे झुडपे तोडुन जमिन स्वच्छ करावी.<br>पावसाळा सुरु होण्यापुर्वी एप्रिल मे महीन्यात १०x१० मीटर अंतरावर १x१x१ मीटर आकाराचे खड्डे खणुन ते चांगली माती आणि ३-४ घमेली कंपोस्ट किंवा शेणखत आणि ३ किलो सुपर फॉस्पेट या मिश्रणाणे भरुन तयार ठेवावेत. |
| काजु | नविन लागवड | जिल्ह्यामध्ये दिनांक १४ ते १८ मे, २०२१ या कालावधी दरम्यान तुरळक ते ब-याच ठिकाणी सोसाट्याचा वारा व मेघगर्जनेसह हलक्या ते मुसळधार स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता वा-या वादळामध्ये नविन लागवड केलेली व साधारणतः २ वर्षापर्यतची काजु कलमे कोलमडु नयेत यासाठी नविन लागवड केलेल्या काजु कलमांना बांबुच्या काठीचा आधार द्यावा. काजु बागेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा<br>चक्रीवादळामुळे वाऱ्याचा वेग वाढण्याची शक्यता असल्यामुळे समुद्र किनारी भागात काजू बागेतील झाडांचे फांद्या मोडून नुकसान होऊ शकते, अशा वेळी मोडलेल्या फांद्या काढून घ्याव्यात व त्या ठिकाणी बोर्डो पेस्ट लावण्याची व्यवस्था करावी<br>चक्रीवादळामुळे वाऱ्याचा वेग वाढण्याची शक्यता असल्यामुळे समुद्र किनाऱ्याकडील भागात काजू बागेतील झाडांच्या फांद्या मोडून नुकसान होऊ शकते व जखम झालेल्या ठिकाणी रोठा या किडीचा प्रादुर्भाव होऊ शकतो अशा मोडलेल्या फांद्या काढुन घ्याव्यात व प्रादुर्भाव आढळून आल्यास नियंत्रणासाठी १५ मि.मी. पटाशिच्या सहाय्याने प्रादुर्भित साल काढून झाडातील रोठ्याला बाहेर काढून मारुन टाकावे व तो भाग २०% प्रवाही क्लोरोपायरीफॉस ५० मी. लि. १० लिटर पाण्यामध्ये मिसळून चांगला भिजवावा. किंवा ५% प्रवाही फिप्रोनील २ मी. लि. प्रति १ लिटर पाण्यामध्ये मिसळवून चांगला भिजवावा. (एका झाडासाठी ५ लिटर पाणी या प्रमाणात वापरावे)<br>काजुची लागवड कलमे लावुन करतात. एप्रिल किंवा मे महीन्यात ७x७ मीटर किंवा ८x८ मीटर अंतर ठेवुन खडडे खोदावेत.<br>हेक्टरी १५५-२०० झाडे बसतात. खड्ड्याची लांबी, रुंदी, खोली ०.६x०.६x०.६ मीटर असावी.<br>खड्ड्यात दीड ते दोन घमेली चांगले कुजलेले कंपोस्ट, १/२ किलो सिंगल सुपर फॉस्फेट किंवा हाडाची पुड मातीत मिसळावी.<br>वाळवी नियंत्रणासाठी २% मिथिल पॅराथिऑन ५० ग्रम भुकटी प्रति खडड्यात टाकावी. |
| नारळ | फळधारणा | जिल्ह्यामध्ये दिनांक १४ ते १८ मे, २०२१ या कालावधी दरम्यान तुरळक ते ब-याच ठिकाणी सोसाट्याचा वारा व मेघगर्जनेसह हलक्या ते मुसळधार स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता वा-या वादळामध्ये नविन लागवड केलेली व साधारणतः २ वर्षापर्यतची नारळ रोपे कोलमडु नयेत यासाठी नविन लागवड केलेल्या नारळ रोपांना बांबुच्या काठीचा आधार द्यावा. नारळ बागेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा<br>नारळ लागवडीसाठी ७.५ × ७.५ मी. अंतरावर १ × १ × १ मी आकाराचे खडडे खोदून उन्हात चांगले तापत ठेवावेत. तयार केलेले खडडे ३ ते ४ घमेली शेणखत किंवा कंपोस्ट आणि १ कि. सिंगल सुपर फॉस्फेट या मिश्रणाने भरुन घ्यावेत. |
| सुपारी | फळधारणा | जिल्ह्यामध्ये दिनांक १४ ते १८ मे, २०२१ या कालावधी दरम्यान तुरळक ते ब-याच ठिकाणी सोसाट्याचा वारा व मेघगर्जनेसह हलक्या ते मुसळधार स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता वा-या वादळामध्ये नविन लागवड केलेली व साधारणतः २ वर्षापर्यतची सुपारी रोपे कोलमडु नयेत यासाठी नविन लागवड केलेल्या सुपारी रोपांना बांबुच्या काठीचा आधार द्यावा. सुपारी बागेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा<br>सुपारी लागवडीसाठी २.७ × २.७ मी. अंतरावर ०.६ × ०.६ × ०.६ मी. आकाराच खडडे खोदून उन्हात चांगले तापत ठेवावेत. तयार केलेले खडडे ३ ते ४ घमेली शेणखत किंवा कंपोस्ट आणि १ कि. सिंगल सुपर फॉस्फेट या मिश्रणाने भरुन घ्यावेत. |
| खरीप भात | खरिप-पुर्वतयारी | भात कापणी केलेल्या शेताची नांगरट करून धसकटे नष्ट करावीत. ज्या शेतामधील पीकांची काढणी पूर्ण झाली असेल त्या शेताची नांगरट करुन जमिन उन्हात चांगली तापू दयावी. खरीप हंगामातील पीकांच्या लागवडीच्या दृष्टीने पूर्व तयारीस लागावे. भात पीकाच्या रोपवाटीकेकरिता शेताची मशागत करावी. |
| केळी | फळधारणा | जिल्ह्यामध्ये दिनांक १४ ते १८ मे, २०२१ या कालावधी दरम्यान तुरळक ते ब-याच ठिकाणी सोसाट्याचा वारा व मेघगर्जनेसह हलक्या ते मुसळधार स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता वा-या वादळामध्ये केळीची झाडे कोलमडु नयेत यासाठी केळीच्या झाडांना बांबुच्या काठीचा आधार द्यावा. केळीच्या बागेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा |
| भुईमुग | काढणी | काही ठिकाणी भुईमुग पीक पक्व होण्याच्या अवस्थेत आहे. काढणीसाठी तयार झालेल्या भुईमुगाची पाने पीवळी होउन गळू लागल्यास तसेच शेंगेच्या आतील साल काळसर व शेंगदाण्यास योग्य रंग आला असल्यास काढणी करावी. काढणी केलेल्या शेंगा उन्हामध्ये ४ ते ५ दिवस वाळवून नंतर साठवणूक करावी.<br>जिल्ह्यामध्ये दिनांक १४ ते १८ मे, २०२१ या कालावधी दरम्यान तुरळक ते ब-याच ठिकाणी सोसाट्याचा वारा व मेघगर्जनेसह हलक्या ते मुसळधार स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता भुईमुगाची काढणी शक्यतो लवकरात लवकर व पर्जन्यमानाचा अंदाज घेऊनच करावी. |
| दुभती जनावरे/ शेळ्या, मेंढ्या | - | जिल्ह्यामध्ये दिनांक १४ ते १८ मे, २०२१ या कालावधी दरम्यान तुरळक ते ब-याच ठिकाणी सोसाट्याचा वारा व मेघगर्जनेसह हलक्या ते मुसळधार स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता जनावरांचे विजांपासुन संरक्षण करावे व जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत. विजांचा लखलखाट होत असताना जनावरे शक्यतो झाडाखाली बांधु नयेत व ती सुरक्षित ठिकाणी गोठ्यामध्ये बांधावित.<br>विजांचा लखलखाट होत असताना व हलक्या स्वरुपाचा पाऊस सुरु असताना मोकळ्या चरावयास सोडलेल्या शेळ्यांच्या/मेंढ्यांच्या कळपासहित शेळी/मेंढपाळांनी झाडांचा आसरा घेऊ नये. झाडावर विज पडण्याची शक्यता असल्याने स्वतःच्या व जनावरांच्या जिवीतास दगा होण्याची शक्यता असते.<br>दुभत्या जनावरांचे गोठे कच्च्या स्वरुपाचे असतील तर ते शाकारुन घेण्यात यावे तसेच गोठ्याशेजारी एखादे धोकादायक झाड किंवा झाडाच्या फांद्या असतील तर त्या त्वरीत तोडुन घेण्यात याव्या व जनावरे कोणत्याही परिस्थितीत सुरक्षित ठिकाणी बांधण्यात यावी. |
| कुक्कुटपालन | - | जिल्ह्यामध्ये दिनांक १४ ते १८ मे, २०२१ या कालावधी दरम्यान तुरळक ते ब-याच ठिकाणी सोसाट्याचा वारा व मेघगर्जनेसह हलक्या ते मुसळधार स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता कोंबडयांचे पाऊसाच्या झडीपासुन संरक्षण करण्यासाठी शेडला बाहेरुन कापडी पडदे लावावेत. कोंबडयांना तसेच पिल्लांना पिण्यासाठी स्वच्छ गार पाण्याचा पुरवठा करावा. |
| फळप्रक्रिया | | आंबा, कोकम, फणस, करवंद, जांभूळ इ. फळांच्या उपलब्धतेनुसार प्रक्रियायुक्त पदार्थ तयार करावेत. |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील "ग्रामीण कृषि मौसम सेवा" योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.

डॉ. प्रदिप च. हळदवणेकर
सहयोगी अधिष्ठाता तथा नोडल ऑफिसर
कृषी हवामानशास्त्रीय क्षेत्र एकक
ग्रामिण कृषि मौसम सेवा
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
०२३६२-२४४२३१

डॉ. यशवत च. मुठाळ
तांत्रिक अधिकारी
कृषी हवामानशास्त्रीय क्षेत्र एकक
ग्रामिण कृषि मौसम सेवा
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
०२३६२-२४४२३१